SPECIAL ISSUE No. 105

ISSN 2349-638x
Impact Factor 7.149

AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

PEER REVIEW & INDEXED JOURNAL

Email id : aiirjpramod@gmail.com

www.aiirjournal.com

# गेल्या दोन दशकांतील मराठी कथालेखन

Chief Editor
Shri. Pramod Tandale

Executive Editor
Prof. Dr. Sunita Shinde

Co-Editor
Prof. Dr. Ramchandra Kalunkhe

Scanned with OKEN Scanner

| Sr. No. | Name of the Author | Title of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 17. | डॉ. ज्ञानेश्वर खिल्लारी<br>प्रा. बाळासाहेब गायके | समकालीन स्त्रीवादी कथालेखन | 72 |
| 18. | प्रा. सुनिल रामराव काकडे | जागतिकीकरण आणि स्त्रियांचे कथालेखन | 76 |
| 19. | स्वाती संतोषराव भोजने | नव्वदोत्तर स्त्रीलिखित कथालेखन : काही निरीक्षणे | 79 |
| 20. | दिपक रायभान कारके | समकालीन दलित कथेतील सामाजिक वास्तव | 83 |
| 21. | डॉ. गणेश मोहिते | मराठी ग्रामीण कथेतील स्थित्यंतरे | 88 |
| 22. | डॉ. सखाराम डाखोरे | समकालीन आदिवासी कथा | 98 |
| 23. | डॉ. सरला गोरे | भटक्या विमुक्तांचे कथात्मलेखन | 103 |
| 24. | विनोद पांडुरंग सिनकर | बबन शिंदे यांची बालकथा | 106 |
| 25. | स्वामी दत्तात्रय बोबडे | समकालीन काही ग्रामीण कथालेखक | 110 |
| 26. | डॉ. लिंगप्पा गुळाळे | गेल्या दोन दशकातील लक्ष्यणीय कथालेखक | 114 |
| 27. | प्रा. डॉ. जनार्दन काटकर | समकालीन कथाकार : सदानंद देशमुख | 120 |
| 28. | डॉ. प्रवीण घारपुरे | कथाकार सदानंद देशमुख | 125 |
| 29. | डॉ. बी. जी. श्रीरामे | आसाराम लोमटे : विलक्षण कथालेखक | 129 |
| 30. | डॉ. रामचंद्र झाडे | आसाराम लोमटे : समकालीन ग्रामवास्तव टिपणारा कथाकार | 131 |
| 31. | प्रा. डॉ. युवराज धबडगे | समकालीन मराठी दलित कथा | 134 |
| 32. | प्रा. कैलास कळकटे | बदलते समाजवास्तव आणि कथालेखिकांच्या लेखनातील स्त्रीप्रतिमा | 139 |
| 33. | डॉ. ज्ञानेश्वर सखाराम गवळीकर | 'भूप' : कथासंग्रहाचा वाङ्मयीन अभ्यास | 142 |
| 34. | डॉ. समिता जाधव | समकालीनत्व आणि पिवळा पिवळा पाचोळा | 145 |

# मराठी ग्रामीण कथेतील स्थित्यंतरे

- डॉ. गणेश मोहिते
उपप्राचार्य,
बलभीम महाविद्यालय, बीड

**प्रस्तावना :**

अतिप्राचीन काळापासून मानवी मनाला गोष्ट सांगण्याची व ऐकण्याची आवड असलेली दिसून येते. याचाच अर्थ अनादी काळापासून कुठल्या ना कुठल्या स्वरूपात कथा अस्तित्वात असल्याचे आढळते. अगदीच मराठी भाषेच्या आरंभीच्या अवस्थेतही कथात्म स्वरूपाचे दर्शन घडते. 'मराठी कथा जन्मल्याबरोबर जरी तत्त्वज्ञानाचे विचार बोलू लागली असली तरी तिला तत्त्वज्ञानाचे वावडे नव्हते'. रिकाम्या वेळी जेथे जेथे एकापेक्षा अधिक माणसांचा समूह असे तेथे तेथे रिकामा वेळ घालविण्यासाठी गोष्टी सांगितल्या, ऐकल्या जात असत. लहाणपणीच आजीबाईच्या गोष्टींमुळे गोष्टींची आवड मानवी मनात निर्माण होत आली आहे. आपणास माहीत नसणारी माहिती मिळविण्याची आणि इतरांपेक्षा वेगळी माहिती देण्याची मानवाची सहज प्रवृत्ती आहे. यातून कथा ऐकण्याची पद्धती रूढ झाली. म्हणजेच कथा या वाङ्मय प्रकाराचे मानवी प्रवृत्तीशी जवळचे नाते आहे.

कथा ही लोकजीवनाच्या अंगोपांगात भिनलेली एक अनन्यसाधारण प्रवृत्ती असून लोकजीवनात आदिम काळापासून ते आजतागायत लोककथा वेगवेगळ्या प्रकारे सांगितल्या व ऐकल्या जात आहेत. जगातील सर्व देशातील सुसंस्कृत, मागास, आदिवासी, डोंगरी, नागरी, ग्रामीण अशा सर्व समाजामधून लोककथा रूढ झालेल्या आहेत आणि अशा अतिपुरातन कथेत मराठी कथेची बीजे सापडतात.

वैदिक वाङ्मयातही 'यम-यती', 'सरमापणी' यांच्या कथा आढळतात. पुढे 'बृहदकथा', 'हितोपदेश', 'पंचतंत्र', 'जातक' अशा प्राकृतातील कथा आढळतात. अशाच स्वरूपातील 'वेताळपंचविशी', 'सिंहासनबत्तीशी', 'बृहदकथा मंजीरी' आदी कथांचा प्रपंच चौदाव्या शतकापर्यंत दिसून येतो.

मराठी कथेचे मूळ स्रोत पाहता पौराणिक आख्याने, संतचरित्रे, आख्यानप्रधान रचना हे कथात्म लेखन असले तरी मराठीतील पहिली लिखित गोष्ट महानुभावीयांच्या वाङ्मयातच दिसून येते.

**मराठी कथेचा उगम :**

मराठीतील पहिला मुद्रित कथासंग्रह सन १८०६ मध्ये तंजावर येथील सर्फोजी राजे यांनी दख्खन पंडिताकडून तयार केलेला 'बालबोध मुक्तावली' हा 'इसापनीती'चे भाषांतर होय. यानंतर डॉ. केरींच्या प्रेरणेने वैजनाथ पंडितांनी 'सिंहासन बत्तीशी', 'पंचतंत्र (१८१५)', 'राजा प्रतापादित्याचे चरित्र' (१८१६) हे कथासंग्रह मराठीत आणले. यानंतर मराठीत मिशनरी वळणाच्या कथा रूढ झाल्या. कृष्णशास्त्री चिपळूणकरांच्या 'अरबी भाषेतील सुरस व चमत्कारिक गोष्टी' अशा कथा लोकप्रिय झाल्या आणि यानंतरच्या काळात खऱ्या अर्थाने कथेला लोकप्रिय करण्याचे कार्य 'करमणूक' आणि 'मनोरंजन' या मासिकांनी केले. ह. ना. आपटे, वि. सी. गुर्जर, ना. ह. आपटे, वा. म. जोशी, शि. म. परांजपे, न. चिं. केळकर यांनी सुरुवातीलाच मराठी कथेच्या विकासात मोठ्या प्रमाणात हातभार लावला आहे. याच काळात मराठी ग्रामीण कथेच्या पाऊलखुणा दिसू लागतात.

**प्राचीन काळातील ग्रामीणत्व :**

"प्राचीन वाङ्मयात लोककथा व लोकवाङ्मयात ग्रामीण स्फुरणे आढळतात. लिखित मराठी कथेची परंपरा पाहिली असता ती चक्रधरांनी सांगितलेल्या दृष्टांत कथांपर्यंत जाते. 'हत्तीचा दृष्टांत', 'बांदेकरांचा दृष्टांत', 'कठीयाचा दृष्टांत' या आणि अशा अनेक दृष्टांत कथा ग्रामीण जीवनाच्या अवलोकनातून स्फुरलेल्या जाणवतात. चक्रधर महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात वावरले, ग्रामीण समाजजीवनाचा जवळून अनुभव घेतला व त्याचा यथायोग्य वापर दृष्टांत कथांमधून केला. म्हणून 'दृष्टांतपाठ' हा मराठीतील पहिलाच कथासंग्रह होय."[१]

महानुभाव वाङ्मयातील कथा या कथा वाङ्मयाची निर्मिती करणे या उद्देशाने झालेली नसून त्या आपल्या तत्त्वज्ञानाच्या स्पष्टीकरणासाठी लिहिल्या आहेत. तेव्हा ग्रामीण कथेचा प्रारंभ विचारात घेताना लोककथा आणि महानुभाव साहित्यातून आलेल्या कथांना महत्त्वाचे स्थान असून या संदर्भात असे म्हणता येईल की, ग्रामीण कथेच्या पाऊलखुणा येथेच दिसतात व तिचा विकास